जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.३०/०१/२०२४
## दि.२९/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे १६/२०२४,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | मंजुनाथ कुरडेकर,वय-३८ वर्षे,रा.शनिवार पेठ,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०१/२०२४ रोजी रात्री १२/३० वा.ते १८/३० वा.चे दरम्यान ४३६,पिनॅक कॉम्प्लेक्स, तिसरा मजला, शनिवार पेठ, पुणे- ३० |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील एक मोबाईल,३,०००/- रुपये रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण २,९१,०००/- रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मनोज बरुरे ८३२९०८९६५१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे ३६/२०२४,भादविक ४४७,५०४,५०६,१४३,१४७,१४९ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-५५ वर्षे,रा.संतनगर,लोहगाव,पुणे |
| **आरोपीत** | १)अमित अंबादास जाधव,वय ३४ वर्षे २) प्रकाश सुरेश जाधव,वय ३४ वर्षे ३)विजय शंकर जाधव,वय ४३ वर्षे ४)तुषार राजेंद्र जाधव,वय ३४ वर्षे ५)चंद्रकांत सुरेश जाधव,वय ३४ ६) संदीप अशोक जाधव,वय २६ वर्षे व इतर सहा महिला,सर्व रा.सर्वोदय कॉलनी,मुंढवा,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०१/२०२४ रोजी १७/०० वा. मौजे केशवनगर मुंढवा हद्दीतील सर्व्हे नंबर ९/१४ येथील हिस्सा नं.५६ ते ६० मध्ये केशवनगर,मुंढवा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे खासगी कंपनी व पुणे प्रोजेक्ट,लेन नं.०५,कोरेगाव पार्क,पुणे येथे अॅडमिन मॅनेजर या पदावर आहेत. कंपनीची पुणे शहरात तसेच पुणे शहरालगत बरेच ठिकाणी जागा असुन,सदर जागेवर कंपनी मार्फत बांधकाम करुन फ्लॅट विक्री केले जाते. त्याचप्रमाणे काही ठिकाणी त्यांची कंपनी जागा जॉईन्ट व्हेंचरवर घेवुन बांधकाम करुन देते. त्यांचे कंपनीने मौजे केशवनगर,मुंढवा हद्दीतील सर्व्हे नं.९/१४ येथील हिस्सा नं.५६ ते ६० मधील पिन्नी ५ को.ऑप. हौसिंग सोसायटीची ४ एकर व शरद को.ऑप.हौसीग सोसायटीची ६ एकर अशी एकुण १० एकर जागा हि विकसन करारा अन्वये विकसनासाठी घेवुन,सदरची जागा कंपनीने पुणे महानगरपालिकेकडुन एन.ए. करुन घेवुन,बांधकाम नकाशे मंजुर करुन घेवुन,सदर जागेवर फिर्यादी यांचे कंपनीचा ताबा असताना,यातील नमुद इसमांनी सदर ठिकाणी गैर-कायदयाची मंडळी जमवुन,अनाधिकृतपणे,बेकायदेशीर जमाव जमवुन,कंपनीचे सुरक्षारक्षक उमेश यादव यास धमकी देवुन,जागेच्या प्रवेशव्दाराची साखळी व कुलुप तोडुन,कंपनीचे जागे मध्ये बेकायदेशीररित्या प्रवेश केला. त्याबाबत फिर्यादी यांनी त्यांना त्या जागेवर आमच्या कंपनीचा ताबा असताना,तुम्ही कसे काय आत आला असे विचारले असता,त्यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून,मारहाण करण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, संजय माळी ७०२१२६४१७५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे १८/२०२४,भादविक ३८१ |
| **फिर्यादी** | जगदीश आसवानी,वय-४९ वर्षे,रा.पिंपरी,पुणे |
| **आरोपीत** | दुकानातील कामगार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/०१/२०२४ रोजी १३/३० वा.संस्कृती हॉटेल,नारायण पेठ,पुणे येथुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे सदाशिवपेठ,पुणे येथे कोअर मोबाईल नावाचे मोबाईल विक्रीचे दुकान आहे. फिर्यादी यांनी दिनांक २६/०१/२०२४ रोजी ३,७०,७००/- रुपये किंचे ॲपल कंपनीचे आयफोन-१५ प्रो-मॅक्स हया तीन मोबाईल फोनची विक्री केलेली होती. सदर मोबाईलचे बीलाचे पैसे घेण्याकरीता फिर्यादी यांनी त्यांचे दुकानातील कामगार यातील नमुद इसम यास त्यांची स्कुटी क्रमांक MH/12/QS/4525 ही घेवुन जावुन,संस्कृती हॉटेल,नारायण पेठ,पुणे येथुन पैसे घेवुन येण्यास सांगितले असता,सदर कामगार याने मोबाईल विक्रीचे ३,७०,७००/- रुपये व स्कुटी १,२५,०००/- रुपयी किंमतीची घेवुन जावुन,असा एकुण ४,९५,७००/- रुपये किचा ऐवज चोरी करून घेवुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मनोज बरुरे ८३२९०८९६५१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ५३/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | प्रमोद मोरे,वय ३४ वर्षे,रा.लोहारा,ता.बाळापुर,जि.अकोला |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २९/०१/२०२४ रोजी सकाळी ०६/४५ वा. वाकडेवाडी, पुणे-मुंबई रोड,खडकी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मलकापुर,जि.बुलढाणा येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,बुलढाणा विभाग येथे वाहक म्हणून नोकरीस आहेत. फिर्यादी हे त्यांचे ताब्यातील एस.टी.बस संभाजीनगर,औरंगाबाद आगारामधून ताब्यात घेऊन प्रवासी भरून वल्लभनगर,चिंचवड,पुणे त्यांचेकडील तिकीट मशिन घेवुन,शिरूर ते रांजनगाव तिकीट मशिन मध्ये शेवटचे तिकीट फाडुन,संगमवाडी,पुणे येथे बस चालकास रोड दाखवत असताना,त्यांचेकडील तिकीट मशिन चालकाचे सिटचे जवळील बोनेटवर ठेवली असताना,वाकडेवाडी,पुणे-मुंबई रोड,खडकी,पुणेचे दरम्यान एस.टी.बस मधील कोणीतरी अज्ञात व्यक्तीने स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता बसचे बोनेटवर ठेवलेली २०,०००/- रू किंची निळ्या रंगाची टिकीट मशिन चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, उध्दव कलंदर ८८८८८४३८१८ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ४६/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-७३ वर्षे,रा.सिताराम नगर,ता.उल्हासनगर,जि.ठाणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०१/२०२४ रोजी १८/३५ वा. ते १८/४५ वा.चे दरम्यान चंदननगर बस स्टॉप ते विमाननगर बस स्टॉप,नगर रोड,पुणे असा पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना बस मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मनपा पीएमपीएमएल बसने चंदननगर बस स्टॉप ते विमाननगर बस स्टॉप,नगर रोड,पुणे असा प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ४०,०००/- रुपये किंमतीचे चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, वाय.एस.चव्हाण ७२७६९४९४९४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**